# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/07/2021 (बुधवार)

(सकाळ)

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावर सप्तशृंगी मंदीर जवळ चनकापुर येथे दिनांक 06/07/2021 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ रेखा जौ. हरीभाउ कुकरेजा, वय 60 वर्ष, रा. खापरखेडा वाड क्र 1 या स्वताचे हरी ओम सेल्स नावाचे एजन्सीचे दुकान बंद करून पोपटी रंगाचे पिशवीमध्ये नगदी 20,000/–रू. घेवुन पायदळ घरी जात होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने सप्तशृंगी मंदीर चनकापुर समोर एका अनोळखी मुलाने फिर्यादीचे हातातील रूपये असलेली पिशवी बळजबरीने हिसकावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री निमगडे 8999917112 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 06/07/2021 चे 08:30 वा. ते 09.00 वा. दरम्यान शंकर उर्फ विक्की छोटेसिंग ठाकुर (मृतक), वय 28 वर्ष, रा. चनकापुर हा त्याच्या एमएच– 40/जी– 6402 क्रमांकाच्या बजाज प्लटिना मोटसायकलने चनकापुर वरून दहेगाव येथे जात असतांना त्याच्या मागुन येणारा एमएच– 31/सीक्यु– 4073 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– राजेन्द्र रामराव कोठे, वय 50 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 इसापुर याने त्याचे ताब्यातील वाहन व भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकच्या चालकास धडक मारून पळुन गेला. या अपघातात मोटरसायकलचा चालक याचा जागेवर मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रमोद भाउराव काटे, वय 36 वर्ष, रा. चनकापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 181(3) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राजेश पिसे पोस्टे खापरखेडा मो. क्र 9881777348 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 15/06/2021 चे 05:45 वा. ते 05.50 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– चंदु गुणवंता गांवडे, वय 35 वर्ष, रा. हुडको कॉलनी कळमेश्वर वाहन चालकाने त्याचे ताब्यातील एमएच– 40/ एडी– 9848 क्रमांकाचा हीरोहोन्डा मोटरसायकल हे वाहन कळमेश्वर ते 14 मैलकडे जाण्याऱ्या सेलु गावाजवळील सर्विस रोडने भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्याचे वाहनाचे समोर अचानक कुत्रा आडवा आल्याने त्याला धडक लागली त्यामुळे आरोपी हा खाली पडला. त्यामुळे त्याचे डोक्याला गंभीर स्वरूपाचा मार लागला त्यास उपचाराकामी प्रथम श्री. हॉस्पीटल कळमेश्वर व नंतर लता मंगेशकर हॉस्पीटल डिगडोह हिंगणा येथे आय. सी. यु. विभागात भरती करण्यात झाले उपचारा दरम्यान दि. 30/06/2021 रोजी 14.00 मरण पावला. आरोपी हा स्वताचे

मरणास जबाबदार असल्याचे पोस्टे कळमेश्वर मर्ग क्र. 63/21 कलम 174 जा.फौ. चे चौकशी अती निष्पण झाल्याने सदर गुन्हा नोंद

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ मोरेश्वर नागपुरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 181(3) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ मोरेश्वर नागपुरे पोस्टे. कळमेश्वर मो. नं. 8888821360 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कुही :– दिनांक 05/07/2021 चे 21:30 वा. ते 23.30 वा. दरम्यान देविदास क्रिष्णाजी कंळबे (मृतक), वय 30 वर्षे, रा. कावरापेठ उमरेड व चालक आरोपी नामे– अ़क्षक नितीन रोडे(मृतक), वय 26 वर्ष, रा. दिघोरी नागपूर हे उमरेड वरून नागपुर ला त्यांचे एम.एच– 31/ एफडी– 1214 क्रमांकाच्या मोटरसायकलने जात असता मौजा कुही फाटया जवळ आर.एम.डब्लु गॅरेज समोर चालकाचे गाडीवरील नियंत्रण बिघडल्याने देविदास कंळबे हा खालीपडुन बॉउंड्री वॉला धडकुन जागीच मरण पावला व चालक अ़क्षक रोडे हा गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सतिश क्रिष्णाजी कळंबे, वय 36 वर्षे, रा. कावरापेठ उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि एस यू मंडवाले मो. क्र 9763234548 या करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. नरखेड :– फिर्यादी नामे– सौ. धारणा पंकज नेहारे, वय 27 वर्ष, रा. मोहगाव भदाडे हीचे लग्न एक वर्षा पुर्वी आरोपी नामे– 1) पति– पंकज रघुनाथ नेहारे याचे सोबत रितीरीवाजाप्रमाणे झाले असुन मागील सहा महीन्यात फिर्यादी ही गरोदर राहली. तिचे पती आरोपी क्र. 1) पंकज रघुनाथ नेहारे, 2) रघुनाथ नेहारे, 3) रूखमाबाई रघुनाथ नेहारे, 4) रोशन रघुनाथ नेहारे, सर्व रा. बानोर व 5) वैशाली राउत रा चिचोरी ता कळमेश्वर यांनी फिर्यादीला त्रास देणे सुरू केले व तिचे चारित्र्यावर संशय घेवुन फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश खोपे 9881582471 हे करीत आहे.

## नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 18 कि.मी. अंतरावर मौजा चोरखुमारी येथे दिनांक 06/07/2021 चे 15.00 वा. ते 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रावण नत्थुजी कोकण, वय 35 वर्ष, रा. चारखुमारी हे हरीसींग सरोते यांचे शेतात ट्रॅक्टर ने नांगरणी करीत असतांना जोरदार विजासह वादळी पाउस आल्याने बचावा साठी मृतक क्र. 1) योगेश अशोक कोकण वय 30 वर्ष रा. चोरखुमारी, 2) मधुकर सावजी पंधराम वय 65 वर्ष रा. चारखुमारी व 3) दिलीप मंगल लांजेवार वय 45 वर्ष रा डोगरी हे हरीसींग सरोते याचे शेतातील झोपडीमध्ये हरीसींग सरोते व नेहात कुंभरे असे एकुण 5 इसम थांबले असता नैसर्गिक विज झोपडीवर पडल्याने सर्व ईसम बेशुध्द पडले असल्याचे फिर्यादीस दिसले थोडया वेळात यातील हरीसींग व नेहाल हे शुध्दीवर आले बाकी ईसम बेशुध्द असल्याने त्यांना उपचार कामी उप जिल्हा ग्रामीण रूग्णालय रामटेक येथे भरती केले असता त्यास डॉक्टरांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलिस नाईक संदीप नागोसे 7972212132 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर